क्र.अका/सा.आस्था/कावि-२७४/२०२३
तहसिलदार, वाशिम यांचे कार्यालय
दि. १६/०६/२०२३

# जाहीरनामा

विषय : कोतवाल संवर्गातील आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्याबाबत....
संदर्भ : मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांचा आदेश क्र.कक्ष-१/आस्था/अका/कावि-१७५/२०२३ दि. ०८/०६/२०२३

उपरोक्त संदर्भिय आदेशाचे अनुषंगाने सर्व संबंधित उमेदवारांना यानुसार सुचित करण्यात येते की, मालेगाव तालुक्या अंतर्गत खालील साझ्याच्या नावासमोर प्रवर्गानुसार दर्शविलेल्याप्रमाणे साझाकरीता कोतवाल पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे. या साझ्यामध्ये त्यांचे नावासमोरील रकान्यात दर्शविल्याप्रमाणे गावांचा समावेश आहे. त्या करीता खालील पात्रतेच्या उमेदवारांनाकडून दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत तहसीलदार, तहसिल कार्यालय मालेगाव जि. वाशिम या पत्त्यावर अर्ज मुदतीच्या आत अर्जदाराने व्यक्तीश: सादर करावा विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अर्जासोबत खुल्या प्रवर्गाच्या जागेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु. ५००/- व आरक्षित जागेकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु. २५०/- परिक्षा शुल्क रोख स्वरूपात तहसिल कार्यालय, मालेगाव जि. वाशिम येथे जमा करून अर्जाचा नमुना प्राप्त करून घ्यावा. (अर्ज अपात्र झाल्यास किंवा उमेदवाराची निवड न झाल्यास कोणत्याही उमेदवारास भरणा केलेले परिक्षाशुल्क परत दिल्या जाणार नाही.)

| अ. क्र. | पदाचे आरक्षण | साझ्याचे नाव |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | चांडस |
| २ | अनुसूचित जाती (महिला) | ब्राम्हणवाडा |
| ३ | अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) | भौरद |
| ४ | भटक्या जमाती (ब) (सर्वसाधारण) | करंजी |
| ५ | भटक्या जमाती (क) (सर्वसाधारण) | वरदरी बु. |
| ६ | भटक्या जमाती (क) (महिला) | कोळगाव बु. |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) | चिवरा |
| ८ | ई.डब्ल्यु.एस. (सर्वसाधारण) | हनवतखेडा |
| ९ | ई.डब्ल्यु.एस. (महिला) | मुंगळा भाग १ |
| १० | खुला (महिला) | तिवळी |
| ११ | खुला (सर्वसाधारण) | नागरतास |
| १२ | खुला (सर्वसाधारण) | बोरगाव |
| १३ | खुला (सर्वसाधारण) | पांगरबंदी |
| १४ | खुला (सर्वसाधारण) | शेलगाव बोंदाडे |

**कोतवाल पदाकरीता उमेदवार खालील अटीस पात्र असावा.**
१. उमेदवार शारीरिकदृष्ट्या सुदृढ असावा.
२. दिनांक ३०.०६.२०२३ रोजी पर्यंत वय १८ पेक्षा कमी व ४० पेक्षा जास्त नसावे.
३. अर्जदार तलाठी साझ्याअंतर्गत रहिवासी असावा.
४. अर्जदार किमान इयत्ता चौथी (४) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५. कोतवाल या पदावर नियुक्ती ही निव्वळ तात्पूरत्या स्वरूपाची असेल.
६. कोतवालास प्रतिमाह रु. १५०००/- इतके मानधन अनुज्ञेय राहील.

**अर्ज करण्याची पद्धत**
१. अर्ज हा विहित नमुन्यात असावा.
२. विहित नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय मालेगाव जि. वाशिम येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
३. विहित नमुन्यातील अर्जा करीता अर्ज शुल्क रु. १०/- रोख स्वरूपात भरावे लागेल.
४. अर्ज सादर करताना अर्जास १० रु. कोर्ट स्टॅम्प चिटकविणे बंधनकारक राहील.
५. जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी तसेच उमेदवारास उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (सन २०२२-२०२३) मागासवर्गीय उमेदवारास अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उमेदवार वगळून)
६. उमेदवाराने पुर्ण भरलेला अर्ज शैक्षणिक पात्रता/जातीचे प्रमाणपत्र इत्यादी विहित नमुन्यात भरून मा. तहसीलदार तथा सदस्य सचिव, तालुका निवड समिती, तहसील कार्यालय मालेगाव जि. वाशिम येथे दिनांक ३०.०६.२०२३ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष अर्ज सादर करावा. विहित वेळेनंतर व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा अर्ज स्विकारला जाणार नाही. कोणीही पोस्टामार्फत किंवा कुरिअर मार्फत अर्ज पाठवू नये. पाठविल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही व कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**कोतवाल पदाकरीता अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**
१. इयत्ता चौथी उतीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुण पत्रिका
२. शाळा सोडण्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र
३. साझ्यातील रहिवासी असल्याबाबत तलाठी यांचा दाखला.
४. आरक्षित पदाचे अर्जा करीता जातीचे प्रमाणपत्र किंवा जात वैधता प्रमाणपत्र
५. मागासवर्गकरीता उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र.(नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र)
६. महिलांकरीता आरक्षित पदाकरीता तहसीलदार यांचेद्वारे निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र. (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र)
७. कोतवालांचे वारसदार असल्यास त्याबाबत तहसलिदार यांचे प्रमाणपत्र
८. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.
९. मागासवर्गीय उमेदवारानी उपजिल्हाधिकारी दर्जाचे सक्षमधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील तसेच जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा (६) महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
१०. उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्याची जाती प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील तसेच शासन निर्णय क्र.बी.सी.सी.२०११/ प्रक्र.१०६४/२०११/१६ ब/दि. १२.१२.२०११ अन्वये उपस्थित उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा (६) महिन्याच्या आत सादर करावयाच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून घेतल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
११. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील(क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलासाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) आणि भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत गटाने प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.
१२. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) आणि वि.मा.प्र. या प्रवर्गातील उन्नत अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या ३०% आरक्षणासाठी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकरण यांचे दिनांक ३१/०३/२०२४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहील.
१३. सर्व कागदत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्र सादर करू नये.

**कोतवाल पदाकरीता निवडीची पद्धत**
१. कोतवाल संवर्गाची पदे नामनिर्देशनाने भरतांना १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.
२. लेखी परिक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाचे ५० प्रश्न राहतील. त्यानुसार सदर लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसुची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**कोतवाल भरती करीता कालबद्ध कार्यक्रम**

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीरात प्रसिद्ध करणे | १९/०६/२०२३ |
| २ | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. १९.०६.२०२३ ते दि. ३०.०६.२०२३, सायंकाळी ०६.१५ पर्यंत |
| ३ | अर्जाची छाननी करून पात्र/अपात्र उमेदवारांची यादी गावनिहाय तयार करून प्रसिद्ध करणे | दि. ०७.०७.२०२३ |
| ४ | आक्षेप नोंदविणे | दि. १२.०७.२०२३ सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत |
| ५ | आक्षेप निकाली काढून परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व उमेदवारांनी स्वत: उपस्थित राहून तहसिल कार्यालयातून प्रवेशपत्र स्विकारणे. | दि. १७.०७.२०२३ |
| ६ | लेखा परिक्षा घेणे | दि. ३०.०७.२०२३ |
| ७ | उत्तरपत्रिका तपासणी | दि. ०४.०८.२०२३ |
| ८ | निवड यादी (निकाल) प्रसिद्ध करणे | दि. ०८.०८.२०२३ |
| ९ | निवड झालेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी करणे. | दि. ०९.०८.२०२३ |
| १० | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त आदेश निर्गमित करणे. | दि. १०.०८.२०२३ |
| ११ | जिल्हाधिकारी कार्यालयास अंतिम अहवाल सादर करणे | दि. ११.०८.२०२३ |

कोतवाल भरती संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्यण घेण्याचे अधिकार अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, वाशिम यांचे राहतील तसेच पात्रतेच्या दृष्टीकोनातून अंतिम निवड करण्याचे अधिकार, अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, वाशिम यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

**सचिव**
**कोतवाल निवड समिती तथा**
**तहसीलदार, मालेगाव**

वि.मा.का./अम./जाही./२५८/२०२२-२०२३